
माणूसवेडा
कॉम्रेड

# माणूसवेडा कॉम्रेड

समाज प्रबोधन अकादमी, लातूर

संपादकः सुधाकर शिंदे

© सर्व हक्क प्रकाशकाधिन

प्रकाशक : समाज प्रबोधन अकादमी,
'मुक्तांकुर' पद्मा नगर, लातूर

अक्षर जुळणी : अरुणा प्रकाशन, लातूर

मुखपृष्ठः के.के. ग्राफिक्स, लातूर

प्रथम आवृत्ती : प्रा.डॉ. विठ्ठल मोरे,
प्रथम स्मृतीदिन १७ सप्टेंबर २०२१

| | | |
|---|---|---|
| ■ शैक्षणिक पंढरीचे विठ्ठल | ● प्रा.डॉ. रामकृष्ण बदने | ६० |
| ■ जिव्हाळा जपणारा नेता | ● कीर्तिकुमार बुरांडे | ६२ |
| ■ माझी झाडसावली | ● सुर्यकांत बाबूराव पवार | ६४ |
| ■ जीवनप्रवास व कार्य | ● अनंत कराड पाटील | ६९ |
| ■ प्राध्यापक संघटनेतील माझे लढवय्ये मित्र | ● डॉ.व्ही.एल. एरंडे | ७१ |
| ■ मार्क्सवादाचे विद्यापीठ | ● कॉ. विजय गाभणे | ७५ |
| ■ मी अनुभवलेले दादा | ● शरद देशमुख | ७७ |
| ■ चळवळीतील सकारात्मक नेतृत्त्व | ● प्रा. गोविंदराव अंबाजी घार | ७९ |
| ■ जिवलग मित्र 'विठ्ठल' | ● प्रा. व्यंकटेश जाधवर | ८१ |
| ■ एक अवलिया आधारवड | ● प्रकाश लक्ष्मणराव सुभेदार | ८३ |
| ■ डाव्या पुरोगामी चळवळीचा बुलंद आवाज | ● प्रा. किरण सगर | ८६ |
| ■ जिवात जीव आणणारा झंझावात म्हणजे दादा | ● कालिदास गायकवाड | ८९ |
| ■ मराठवाड्यातील 'आदर्श विठ्ठल' | ● प्रकाश संतराम शहापुरे | ९१ |
| ■ जनसामान्याच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारा संघर्षशिल प्राध्यापक | ● प्रा.उध्दव कोळपे | ९२ |
| ■ संघर्षसूर्य असलेल कर्मयोगी | ● डॉ. मकरंद गिरी | ९७ |
| ■ आमचे दादा | ● सुप्रिया संजय कुलकर्णी | १०० |
| ■ परिवर्तनवादी चळवळीचा आधारस्तंभ | ● डॉ.आर.व्ही. कठारे | १०२ |
| ■ अन्यायाविरूध्द लढा देणारे समान्यांचे कैवारी | ● प्रा.वैजनाथ मलशट्टे | १०४ |
| ■ परिवर्तनवादी विचारांचे एव्हरेस्ट | ● विवेक सौताडेकर | १०७ |
| ■ डाव्या चळवळीचे आधारवड | ● कॉ. अर्जुन आडे | ११० |
| ■ संकल्पयात्री मित्र | ● प्रा. तनुजा येलाले | ११२ |
| ■ अनुभवलेला सहृदयी बापमाणूस | ● प्रा.डॉ. अनंतकुमार करडे | ११५ |
| ■ संयमी आणि संघर्षशील विचारांचे अलौकिक व्यक्तीमत्त्व | ● भाई ॲड. उदय गवारे | ११८ |
| ■ दोस्तीच्या दुनियेतला वस्ताद | ● भिमराव लटपटे | १२१ |
| ■ मी अनुभवलेल दादा | ● डॉ. जी.पी. कापसे | १२५ |
| ■ इतकी सहजता येते कुठून? | ● डॉ. हनमंत पवार | १२८ |
| ■ डाव्या चवळवळीचे आधारवड | ● कॉ. डी.पी. कांबळे | १३४ |
| ■ कार्यकर्त्यांचे आधार | ● कॉ. प्रेमगीर गिरी | १३७ |

○○○

# अनुभवलेला सहृदयी बापमाणूस
# डॉ. विठ्ठल मोरे

प्रा. डॉ. आनंदकुमार सुभाष करडे

दि. २१ डिसेंबर २००३ चा दिवस होता. मी बार्शीहून कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी येथे डॉ. विठ्ठल मोरे यांच्याकडे पीएच.डी. नोंदणी करावी या हेतूने पोहोचलो. सरांना पहिल्यांदाच भेटत होतो. त्यांची काटक प्रकृती व पायाला थोडासा झटका मारत चालण्याची लकब आजही नजरेसमोर तरळते. पीएच. डी. च्या विषयावर चर्चा झाली. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावर अभ्यासाचे निश्चित झाले. संशोधनाचा आराखडा तयार केला. मार्गदर्शक म्हणून सरांचे नाव डॉ. विठ्ठलराव शहाजीराव मोरे असे लिहिले. खाजगीमध्ये सरांना सर्व याच नावाने ओळखायचे. मी देखील तोच प्रयत्न केला. सरांनी मला पहिल्याच वेळेस सांगितले, 'मला डॉ. विठ्ठल मोरे याच नावाने ओळखतात. डॉ. विठ्ठलराव मोरे या नावाने मला सहसा कोणीच ओळखत नाही.' येथेच मला सरांचा स्पष्टवक्तेपणा व कामातील दिशा लक्षात आली होती. जसजसे सर समजले त्यातून सरांच्या विचारांची मजबूतता व संवेदनशीलता मला अधिकच प्रभावी बनवीत होती. सर कायम पांढरी लुंगी व डोळ्यांवर चष्मा लावून घरामध्ये वावरायचे. त्यांचा हा साधेपणा आजही मनाला भावतो.

माणसाच्या जीवनात त्याला घडविणारे अनेक घटक असतात. काही घटक हे जन्माने मिळतात, जसे की, आई-वडील होय तर काही घटक तुमच्या कार्याने व विचारांच्या दिशेमुळे मिळतात. हा दुसरा घटकच तुम्हाला समाजाकडे पाहण्याची व्यावहारिक दृष्टी देत असतो. या घटकांना मी सामाजिक पितृत्व देणारा घटक मानतो. यामध्ये डॉ. विठ्ठल मोरेसरांचा आवर्जून उल्लेख करावाच लागेल. त्यांच्या उल्लेखाशिवाय माझ्यामध्ये आलेल्या स्पष्टवक्तेपणाचे अस्तित्व मी मान्यच करू शकत नाही. सर, जेव्हा जेव्हा वाशीवरून मुंबईला संघटना किंवा पक्षाच्या कामासाठी बार्शीमार्गे कुर्डुवाडीहून मुंबईला जात असत तेव्हा बार्शीमध्ये डॉ. विठ्ठल मोरेसर व सुटाचे कार्यवाह डॉ. राणू कदम बार्शीत प्राध्यापकांच्या समवेत बैठका व्हायच्या तसेच प्राचार्य व. न. इंगळे, प्राचार्य एस. के. मोरे, कॉम्रेड मा. ज. ब. शिराळ (अण्णा), डॉ. एल. एम. तायडे व प्रा. शेषराव जाधव यांच्या आर्वजून गाठीभेटी घ्यायचे. जवळच्या माणसांच्या कुटुंबीयांची आपुलकीने व आस्थेने चौकशी करणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संवेदनशीलता होती.

प्रत्यक्षात कामकाजातील समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी सरांचा कायमच प्रयत्न होता. बार्शीहून कुर्डुवाडीला गेल्यानंतर डॉ. मोरे मॅडमनी दिलेल्या भाकरी व डब्यातील साधी कमी तेलाच्या भाजीचा जेवणाचा बेत व्हायचा. जेवणासोबत मेथीची कच्ची भाजी आर्वजून असायची. सरांच्या जेवणात कायमच एक कच्ची भाजी असायची हे विशेष. वाशीत तर कित्येक वेळा हा प्रसंग आला. मॅडम व सर आवर्जून सांगायचे जेवल्याशिवाय जायचे नाही. जेवण हे निमित्त व्हायचे मात्र चर्चा व्हायच्या समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्म-जाती, साहित्य, वाङ्‌मय, नेतृत्वाच्या कार्यक्षमता व उत्तरदायित्वाच्या भूमिका याविषयी. कुर्डुवाडीमध्ये सिध्देश्वर एक्सप्रेस येईपर्यंत मनसोक्त चर्चा व्हायची. आपल्या योग्य त्या मुद्यांवर ठाम राहणे, मत मांडताना अहंकार व आक्रमकपणापेक्षा, संवेदनशीलता व अभ्यासूपणा महत्त्वाचा असतो याची जाणीव होऊ लागली. आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीवर आपल्या कृतीचा कोणता प्रभाव पडतो याचा सर कायमच पाठपुरावा घ्यायचे. मोरे कुटुंबीयांचे घर व घरातील सर्व सदस्य हे शोषित, वंचित, कामगार, चळवळीतील कार्यकर्ता, विद्यार्थ्यांना कायमच आधार राहिलेले आहे. आदरणीय सरांचे थोरले बंधू मा. अण्णांचा हा संस्कार होता.

कृतीव्दारे अनुभव देणे ही सरांची खासीयत होती तसेच संघटनकौशल्य हे सरांच्या व्यक्तीमत्त्वाचे विशेष वैशिष्ट्य होते. मूलभूत गरजांची सोडवणूक झाली तरच आपल्या समाजाच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. समाजातील दारिद्र्य हे वास्तवातील असेल, मात्र त्यामागील कित्येक वर्षांपासून चालत आलेली मानसिक दारिद्र्याची अवस्था संपविल्याशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही याची मांडणी सरांच्या विचारांतून व्हायची. कित्येक वेळा, तासन तास डॉ. विठ्ठल मोरेसर व प्राचार्य डॉ. सुर्यकांत जगदाळे सर यांच्याशी वाशीच्या पोलिस वायरलेस टॉवरकडे फिरण्यासाठी गेल्यावर याविषयी चर्चा करण्याची संधी आली. यातून माझा विस्कटलेला वैचारिक पिंड घडला. सत्तेशी वैर न घेता तिच्याव्दारे वैधानिक मागण्यांची पूर्तता करावयाची. यातूनच संघटना, सहकारी यांच्या प्रश्नांची सोडवणूक करायची ही त्यांची कार्यशैली होती. सत्ता व सत्तेच्या परिघातील संधिसाधूपणाने डॉ. विठ्ठल मोरेसरांच्या व्यक्तिमत्त्वाला स्पर्शदेखील केला नाही. हाच त्यांचा व्यवहार वास्तववाद त्यांचे वेगळेपण भासवतो. तासिका तत्वावर कार्य करणाऱ्या प्राध्यापकास ८३/- रुपये तासाप्रमाणे मानधन मिळायचे. ते फारच अपुरे होते. एके दिवशी बार्शीहून कुर्डुवाडीला जाताना सरांशी बोलत असताना चर्चा निघाली. लग्नाचे काय. सरांना उत्तर दिले ८३/- रुपये कमविणाऱ्याशी कोण लग्न करेल मोरेसर म्हणाले, उद्या मंत्रिमहोदय मा. राजेश टोपेसाहेब यांच्याशी बैठक आहे त्यांच्याशी बोलतो व विषयाचा निकालच लावतो. बरोबर एका महिन्यात ८३/- रुपयाचा तास ३०० रुपयांन झाला. त्यामुळे सात हजार रुपयापर्यंत मानधन मिळू लागले. यामुळे माझ्यासारख्या अनेकांचे लग्नाचे प्रश्न निकाली निघाले. एक मात्र विशेष सर शेकडो वेळा लातूर किंवा वाशी येथून कुर्डुवाडीमार्गे मुंबईला गेले. मात्र त्यांनी त्यांच्या हातातील बॅग किंवा पिशवी कधीच कोणाला घेऊ दिली नाही. त्यांची ती पुढच्या माणसाचे माणूसपण व स्वाभिमान जपण्याचा सरांचा मोठेपणा खूप काही शिकवितो. पुढचा माणूस, मग तो मोठा असो किंवा लहान असो. त्यांचा सन्मान ठेवणे ही सरांची जगण्याची पध्दती होती. सरांच्या याच गुणामुळे सर कधीच पीएच.डी. चे मार्गदर्शक वाटलेच नाहीत. ते कायमच वयाने मोठा व परिपक्वतेने भारावलेला अशा प्रकारचा ज्येष्ठ मित्रच भासले. यामुळेच सर आज आपल्यात नाहीत असे वाटतच नाही. कारण रोजच्या जगण्यामध्ये त्यांच्या कार्याची सांगड जीवनाशी घट्ट बसलेली आहे. सरांना फोन केला की, सर त्या व्यक्तीस कधीच

त्याच्या पदाने किंवा इतर नावाने बोलत नव्हते. ते कायमच त्या व्यक्तीच्या मूळ नावाने बोलायचे. जसे की, मी फोन केला तर म्हणायचे, 'हं बोला आनंदराव किंवा हं बोला करडेजी' आपल्याच विद्यार्थ्याला एवढे सन्मानाने बोलणारा हा बापमाणूस होता. हे फक्त माझ्याच बाबतीत नव्हते तर प्रत्येकालाच याचा अनुभव आला असेल. संस्काराने मोठा असलेला माणूसच स्वत:च्या मनाला मोठे करू शकतो हे मी सरांकडून शिकलो. सरांच्या या संस्कारामुळे माझी स्वत:विषयी विचार करण्याची नकारात्मकता व एकाकीपणाची भावना कमी होण्यास मदत झाली. कदाचित सर भेटले नसते तर मी मानसिकदृष्ट्या कमकुवत व खचलेला दिसलो असतो हे मला मान्य करताना कसलाच संकोच वाटत नाही. आपल्याच माणसासमोर कसला आलाय संकोच आणि आडपडदा! हेच तर डॉ. विठ्ठल मोरेसरांचे सामाजिक व नैतिक संस्कार आहेत.

बार्शीमध्ये कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या संस्थेत कार्य करताना डॉ. विठ्ठल मोरे व कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी हे समीकरणच होते. संस्था व महाविद्यालयाच्या प्रत्येक कार्यात सरांचा आवर्जून उद्देश होतोच. एका फोनवर अशक्य काम शक्य करणारा हा बापमाणूस होता. आजही महाराष्ट्रात कोणत्याही महाविद्यालयात गेलात तर वाशीचे कॉलेज म्हटले की, विठ्ठल मोरेंचे कॉलेज का ? त्यामुळे सरांच्या नावाचा मोठेपणा जपणे व तो वारसा पुढे चालविणे ही मोठी जबाबदारी आहे. सरांचे स्वप्न होते की, कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी येथे एम. ए. राज्यशास्त्राचे शिक्षण असावे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीने सरांच्या स्मरणार्थ पदव्युत्तर शिक्षणाचे वर्ग सुरू केले तसेच या वर्गात पहिल्या क्रमांकाने उतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. विठ्ठल मोरे सरांच्या स्मरणार्थ १०००/- रुपयांचे कायमस्वरूपी बक्षीस ठेवले आहे. आपल्या कर्मचाऱ्याच्या आठवणी जपणारी संस्था व डॉ. विठ्ठल मोरे सरांचे ऋणानुबंध खूप काही शिकवून जातात. सरांचेदेखील संस्था व महाविद्यालय उभारणीतील योगदान सर्वश्रुत आहे.

डॉ. विठ्ठल मोरेसरांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सरांनी काही तरी दिलेलेच आहे. मग ते नोकरीपासून ते जीवनात येणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची क्षमता येथपर्यंत. याच आधारावर माझ्यासारख्या अनेक नवविचारांचे घटक सरांच्या कार्याला व संस्काराला पुढे घेऊन जातील. डॉ. विठ्ठल मोरेसर आज नाहीत असे मुळीच नाही. ते शरीराने आपल्यात नाहीत. मात्र त्यांचे संस्कार व त्यांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन रोजच्या जगण्यात स्वीकारला तर हा बापमाणूस जीवनाच्या प्रत्येक वळणावर आपल्याला सावरताना दिसेल. डॉ. विठ्ठल मोरेसरांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

●●●

# मानवी हक्क

## ( समकालीन सामाजिक परिप्रेक्ष्य )




सपांदक

**डॉ. रिता एम. धांडेकर**

# मानवी हक्क

( समकालीन सामाजिक परिप्रेक्ष्य )

■ डॉ. रिता एम. धांडेकर

■ प्रथम आवृत्ती – १० डिसेंबर २०२१

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-55-0

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पु.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | पर्यावर संरक्षण आणि भारतीय नागरिक | डॉ. केशव सुर्यभावसार गुल्हाणे | 1 |
| 2 | समकालीन समाजातील मानवी हक्क विषयक समस्या आणि आव्हाने | डॉ श्रीनिवास भोंग | 7 |
| 3 | मानवाधिकार व बालकांचे कुपोषण | डॉ. मदन जी. प्रधान | 13 |
| 4 | मानव अधिकार आणि बालमजुराच्या समस्या | डॉ. विठ्ठल घिनमिने | 20 |
| 5 | भारतीय संविधान आणि मालमत्तेचा हक्क | डॉ.संजय शत्रुघ्न लांडगे | 30 |
| 6 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | डॉ. प्रा. अश्विनी अविनाश खापरे<br>डॉ. राजश्री ना. कडू | 39 |
| 7 | मानवी हक्क आणि महिलांचे अधिकार | प्रा.संजय सी.गिऱ्हेपुंजे | 46 |
| 8 | तृतीयपंथी आणि मूलभूत अधिकार | पी.डब्ल्यु.पाटील | 57 |
| 9 | भारतीय राज्यघटना व भारतातील मानवी हक्क चळवळ | डॉ. ए. एस. करडे | 61 |
| 10 | मानवाधिकार एवं सविधान के प्रावधान | डॉ. रविंद्र बोरकर | 69 |
| 11 | पंचायतराज आरक्षण प्रश्न आणि भारतीय लोकशाही | प्रा.डॉ. नितीन कारभारी जाधव | 74 |

# भारतीय राज्यघटना व भारतातील मानवी हक्क चळवळ

डॉ. ए. एस. करडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी ता. वाशी जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

---

**विषयाचे महत्व**

लोकशाही म्हणजे जर लोकांचे लोकांनी निवडलेले लोकांसाठीचे सरकार असेल तर लोकांनीच सरकारची कर्तव्ये पार पाडली पाहिजेत या मताचा मी आहे. काही व्यवस्थेत लोकांना शासन निवडण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग घेणे अनिवार्य असले तरी हे नकारात्मक किंवा अधिकाराची पायमल्ली आहे असे म्हणता येणार नाही. जसे की नागरिकांनी निवडणूकीत मतदान करणे अनिवार्य करण्याचा असलेला विचार. अशाप्रकारची सक्ती करण्याने मूलभूत अधिकाराचे तत्व नकारात्मक होत नाही म्हणूनच जनतेने जागरूक राहून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीने सरकार जेव्हा सैरभैर व्यवहार करते तेव्हा लोकांनी वेगवेगळया घटकांव्दारे जसे की, आंदोलन, मोर्चे याव्दारे हस्तक्षेप केला पाहिजे आणि शासनाला अचूक मार्गावर आणले पाहिजे. अशाप्रकारचा हस्तक्षेप सकारात्मक व्यवहारातून आणि आंदोलनातून करता येतो म्हणून नागरिकांना नागरी आणि राजकीय हक्क असलेच पाहिजेत. अशा हक्कांच्या अभावी लोकशाही म्हणजेच कोणतेच मूळ नसलेली व्यवस्था होय. एक उपचारात्मक अशी गोष्ट ठरेल असे म्हणता येईल.

**भारतातील मानवी हक्क चळवळीची वाटचाल :-**मानवी हक्क अंगी बाणवण्याने व संस्कृतीचा घटक बनवण्यानेच आपली लोकशाही बळकट होईल. भारतीय संविधानाने नागरी, राजकीय, धार्मिक, भाषिक व सांस्कृतिक हक्कांना मूलभूत मानवी हक्क म्हटले आहे व ते संयुक्तिक आहे. मात्र आर्थिक हक्कांना आपण मूलभूत हक्क म्हणू शकत नाही व त्याचे तसे समर्थनही करता येत नाही. भारताच्या फाळणीनंतर मानवी हक्क म्हणून जे जे काही आहे यांची सरसकट धूळधाण झाली. दोन्ही बाजूचे लाखो लोक त्यात भरडले गेले. निर्वासितांचे पुनर्वसन, काश्मिरमधील युध्द, जीवनावश्यक वस्तूंचे व संसाधनांचे दुर्भिक्ष यामुळे सारा देश आर्थिक अरिष्टात सापडला. देशाचे तत्कालीन कायदामंत्री व मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर व अन्य नेते हे ज्यांचे मूलभूत हक्क म्हणून समर्थन करता येणार नाही अशा काही गोष्टी मूलभूत हक्कांच्या यादीत जोडू पाहात होते. मात्र चर्चेअंती त्यांचे मन वळविण्यात आले व अशा बाबी स्वतंत्र प्रकरण करून मार्गदर्शक तत्वांमध्ये समाविष्ट करण्यात आल्या.[1] या बाबी महत्वाच्या व मूलभूत म्हणता येतील अशाच होत्या. त्यांना धरून कायदे बनविणे हे सरकारचे कर्तव्य ठरविण्यात आले आहे. मानवी हक्कांची

तुकडया तुकडयाने अंमलबजावणी करता येत नाही परंतु ते परस्परावलंबी आहेत. काही हक्क अंमलात आणले व काही पायदळी तुडवले असे होवू शकत नाही. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेले आर्थिक अधिकार अंमलात आणता येत नसतील तरी त्याविरूध्द नकारात्मक भूमिकेतून कायदे करून त्यांची पायमल्ली करता येत नाही. त्यामुळे जेव्हा असे कायदे होतात तेव्हा त्यांना आव्हान देता येते. भारतासारख्या देशात जिथे मानवी हक्क, खास करून शोषित, भटके, मागास, स्त्रियांचे हक्क नाकारले जात आहेत, व सामाजिक स्थान, प्रतिष्ठा, व्यावसाय, हक्क हे जन्म श्रेष्ठत्वावर आधारित आहेत. तिथे केवळ मतदानाची समानता देवून लोकशाही रूजूत नाही. सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य व समानतेच्या जोडीला राजकीय स्वातंत्र्य आणि समानता ही असलीच पाहिजे तरच लोकशाही रूजू शकेल.

ज्या समाजात बहुसंख्य लोक वंचित घटकात मोडतात त्यांच्या बाबतीत तर ते अधिकच खरे आहे. अस्तित्वात आहे तिथे तर सर्वांसाठी स्वातंत्र्य व समता निदान बहुसंख्य जनतेसाठी स्वातंत्र्य, समता येवू शकत नाही. लोकशाहीवर नेहमी असा हल्ला होतो की लोकशाही राजवट म्हणजे लोकप्रियतावादी राजवट आहे. त्या टीकेचा आधार कोणता? तर सर्वसामान्य जनता नेहमीच अडाणी असते आणि राज्यकारभार करण्याची तिची क्षमता नाही हा दृष्टिकोनच मुळात लोकशाहीच्या अंमलबजावणीसाठी नकारात्मक आहे. लोकशाही व्यवस्था ही आतापर्यंतच्या सर्व व्यवस्थांमध्ये सर्वोत्तम मानली गेली आहे आणि मानवी समाजाला ती अनुकरणे भाग आहे. म्हणूनच सर्वसामान्य जनतेचे शिक्षण करणे आणि तिलाच राज्यकारभार करण्यासाठी सक्षम बनविणे हा त्यावर उपाय आहे. ते घडवून आणायचे असेल तर सर्व नागरिकांना मूलभूत हक्क उपभोगता आले पाहिजेत. जेणेकरून ते शारीरिक, मानसिकव बौध्दिकदृष्टया स्वतःचा कारभार स्वतः करण्यासाठी सक्षम होतील. भूतकाळातील त्रुटी काहीही असोत, मानवी समाजाची प्रगती व विकास यामुळे नवनवीन उत्पादन पध्दती व उत्पादन साधने निर्माण झाली आहेत. यामुळे जनतेचे शिक्षण करणे, तसेच तिला देशाच्या राज्यकारभारात सहभागी होण्यासाठी सक्षम बनविणे हे आता शक्य आहे. त्यासाठी खऱ्याखुऱ्या इच्छाशक्तीची मात्र गरज आहे. परंतु स्वार्थापोटी त्याचा अभावच वेळोवेळी दिसून येतो. जनतेच्या हातात सत्ता ही घोषणा प्रत्यक्ष व्यवहारात मूठभरांच्या हातात सत्ता असे बनले आहे. जे भारताच्या बाबतीत खरे आहे तेच इतर काही देशांबाबतही खरे आहे. कारण या देशांमध्येही भारताप्रमाणेच लिंग, जात जमात, वंश, प्रदेश, धर्म, भाषा यांच्या आधारे स्वतंत्र पातळीवर अथवा एकत्रितपणे भेदभाव केला जातो. या संदर्भात सर्वांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्क जाहीरनाम्यातील २८ व्या कलमाची आठवण ठेवणे आवश्यक आहे. यात सह्या करणाऱ्या देशांनी मानवी हक्कांचे अंमलबजावणीस योग्य सामाजिक तसेच आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्याचे आवाहन केले आहे. तरीही मला असे वाटते की, सर्वच राष्ट्रे (लष्करशाही, समृध्द राष्ट्रे) उलटया दिशेने चालली आहेत. मानवी हक्क ही संकल्पना आता बऱ्याच सामाजिक आणि राजकीय

गटांकडून वारंवार वापरली जावू लागली आहे. मानवी हक्क हे व्यक्तीचे निसर्गदत्त अधिकार आहेत आणि त्यांच्याशिवाय व्यक्ती ही व्यक्ती म्हणून अस्तित्वात राहू शकणार नाही. राज्याकडून या अधिकाराची पायमल्ली अपेक्षित नाही. थोडक्यात राज्याच्या सर्वंकष कारभारापासून अधिकारांचे संरक्षण व्हायला हवे.

व्यक्तीचे अधिकार व त्यासंबंधीची चळवळ याला पाश्चात्य राष्ट्रांना मोठा इतिहास आहे. १८ व्या शतकाच्या कालखंडात फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांतीच्या काळात झालेल्या चळवळींचा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील नेते, चळवळ व विचारवंतावर खूप मोठा परिणाम झालेला आहे. समाजसुधारणेच्या चळवळी व विविध गटांच्या राजकीय चळवळींबरोबर मानवी हक्क मागणीसाठी राष्ट्रीय सभेने (काँग्रेसने) उपलबध करून दिलेले देशव्यापी व्यासपीठ याच प्रेरणेतून उभे राहिले. समाजसुधारक, उदारमतवादी राजकीय नेतृत्व आणि आर्थिक कारणातून उदयाला आलेल्या नेतृत्वाचा समावेश यामध्ये होता. समाजसुधारकांनी समाजातील स्त्रिया व शोषित वर्गाच्या उध्दारासाठी रूढी व परंपरा यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचे कार्य या चळवळींतून केले. उदारमतवादी वर्ग हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य व कायद्यापुढील समानतेसाठी प्रयत्नशील होता. ब्रिटीशकाळात गुन्हेगारींशी संबंधित खटल्यात भारतीय न्यायाधिशांची नेमणूककरण्यात यावी अशी सुधारणा मांडणारे इलिबर्ट विधेयक मूळ स्वरूपात संमत न होणे हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (१८८५) अस्तित्वात येण्याचे एक प्रमुख कारण होते. २० वे शतक संपताना चळवळीचा हा संदेश पुढच्या पिढीकडेही हस्तांतरीत झाला. या नेतृत्वाजवळ स्वत:चे विचार, व कल्पना होत्या. ब्रिटीश साम्राज्याच्या जोखडातून मुक्त होवून स्वतंत्र नागरिक म्हणून ओळख प्रस्थापित करण्याची घाई या नवीन पिढीला झाली होती. स्वातंत्र्य आंदोलनाचे अभ्यासक सीताराम काकरला यांच्या म्हणण्यानुसार, या मूलभूत मानवी हक्कांची जाणीव समाजातल्या कष्टकरी व मध्यमवर्गाच्या अस्तित्वाबरोबर वाढीला लागली. तोपर्यंत नागरी स्वातंत्र्य ही संकल्पना समाजातल्या केवळ पुढारलेल्या वर्गापुरती मर्यादित होती.[2] दुसऱ्या शब्दात अधिकार म्हणजे भारतातल्या पुढारलेल्या वर्गावर वसाहती राज्याने केलेली उपकारांची खैरात होती. याच दृष्टिकोनाचा पाठपुरावा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पहिल्या तीन वर्षाच्या कार्यकाळात केला. १९१८ मध्ये काँग्रेसने ब्रिटीशांसमोर हक्कांचा जाहीरनामा ठेवण्याची तयारी केली. यात भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती, संघटनास्वातंत्र्य, कायद्याप्रमाणे वागवले जाण्याचा अधिकार व या सर्वांच्या जोडीने वांशिक भेदातून मुक्ततेची मागणी केली. कालांतराने मोतीलाल नेहरू समितीने १९२८ साली भारतीयांना नाकारण्यात आलेल्या मूलभूत हक्कांची मागणी केली. ब्रिटीशांनी या मागण्या नाकारल्या तरी काँग्रेसने १९३१ च्या कराची अधिवेशनात मूलभत हक्काबाबत ठराव संमत केला. १९३६ मध्ये पंडित नेहरूंनी मूलभूत हक्काबाबत पहिली संघटना इंडियन सिव्हिल लिबर्टीज युनियन या संघटनेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. इंडियन सिव्हिल लिबर्टीज युनियनची स्थापना १९३६ मध्ये मुंबई येथे झाली. यावेळी तिचे

पहिले अध्यक्ष म्हणून रविंद्रनाथ टागोर यांनी कामकाज पाहिले. या संघटनेच्या उद्घाटन प्रसंगी नेहरू म्हणाले होते की, सरकारला विरोध करण्यासाठी या संघटनेची आवश्यकता आहे. १९४५ मध्ये तेजबहादूर सप्रू यांनी मूलभूत अधिकारावर भर देणारे चौथे संसदीय विधेयक मांडले होते व नंतर राज्यघटनेत याचा समावेश देखील करण्यात आला. भारतीय संविधानाला समृध्द करणारे मूलभूत हक्क स्वातंत्र्य लढयामुळे प्रत्यक्षात आले. वसाहतवादी काळात नागरी हक्क चळवळ मर्यादित आहे. मात्र या हक्कांसाठी लढणाऱ्या समाजगटांचा परिचय आवश्यक आहे.[3]

स्वातंत्र्यानंतर मूलभूत हक्कांची चळवळ दोन भागात विभागली आहे. आणीबाणीपूर्वी व आणीबाणीनंतरचा कालखंड असे दोन कालखंड पाडता येतील. प. बंगाल मधील कम्युनिस्ट राजवटी विरोधात १९४८ साली सिव्हील लिबर्टीज कमिटीची स्थापना झाली. मूलभूत हक्कांच्या चळवळीच्या दृष्टिने हा कालखंड महत्वाचा नाही. मूलभूत हक्कांची चळवळ खऱ्या अर्थाने १९६० च्या उत्तरार्धात सुरू झाली. सरकारने नक्षलवाद्यांवर केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर चळवळ सुरू झाली. समाजातल्या वंचितांच्या न्याय व समानतेच्या मागणीतून निर्माण झालेल्या लोकशाही हक्कांचा पुरस्कार चळवळीने केला. के. सीताराम यांच्यामते, ज्यांना न्यायासाठी संघर्ष करावा लागतो, त्यांच्यासाठी लोकशाही हक्क आवश्यक आहेत. मूलभूत हक्क व्यक्तीसाठी पुरेसे आहेत. ज्या हक्कांचे अस्तित्व मान्य असते पण अंमलबजावणीत कसूर केली जाते. लोकशाहीत हक्क नाकारल्याने ते मिळविण्यासाठी संघर्ष प्रवृती बळावते.[4]

नंदिता हक्सर यांनी याचे चार विभागात वर्गीकरण केले,

१) कैद्यांशी संबंधित विषय (कच्च्या कैद्यांचा चुकीच्या पध्दतीने तपास, तुरुंगातील वातावरण याचा समावेश होतो.)

२) पोलिसांकडून करण्यात येणारी हिंसा (नंतरच्या काळात सशस्त्र सैन्यांकडून) तुरूंगातील छळ, बेकायदेशीर गोळीबार, कायद्याचा अतिरिक्त वापर करून केलेल्या बनावट चकमकी.

३) व्यक्ती स्वातंत्र्याविरोधातले कायदे, एखाद्या भूभागात प्रवेशबंदी, टाडा /मिसा /पोटा आणि शोषितांच्या विरोधात वापरले जाणारे कायदे. (उदा. जंगल कायदा)

४) अल्पसंख्य व असंघटित कामगारा विरोधातले कायदे, करारबध्द कामगार, मजूर, वेठबिगार, झोपडपट्टीवासीयांचे प्रश्न, भूमिहीन शेतमजूर व धार्मिकदृष्टया अल्पसंख्याकांच्या विरोधात सरकारकडून करण्यात येणारे शोषण.

मानवी हक्क विषयक चळवळीचे एक मुख्य काम असते ते म्हणजे पोलिस, सशस्त्र बल, लष्कर, सरकारच्या अन्य यंत्रणामार्फत आणि छळवणूक करणाऱ्या जाती, वर्गाकडून करण्यात येणाऱ्या हिंसेला नोंदवून ठेवायचे या कामी पाच ते सहा जणांचा सत्यशोधन संघ प्रत्यक्ष ठिकाणी भेट देतो. पोलिसांकडून प्रत्यक्ष परिस्थिती समजावून घेतो, प्रसारमाध्यमे आणि अन्य शक्य त्या मार्गाने पुरावे गोळा करतो. त्या पुराव्यांआधारे करण्यात आलेला

अहवाल प्रसारमाध्यमे आणि मध्यमवर्गामध्ये पसरवला जातो. संसद, राज्य विधीमंडळ, मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांकडून ॲट्रॉसिटी सारख्या विषयांना भरपूर प्रसिध्दी दिली जाते. मानवी हक्कांचे ज्याने उल्लंघन केले आहे त्याच्यावर कारवाईसाठी स्वाक्षरीची व ई मेल मोहिम, जनहित याचिका, वर्तमानपत्रांमधून लेख, धरणे आंदोलन, सभा, निदर्शने आणि उपोषण ही केले जाते. घटनेतल्या शोषिताला न्याय मिळवून देण्यासाठी जनहित याचिकाही न्यायालयात दाखल केल्या जातात. संयुक्त राष्ट्र संघ, ॲमनेस्टी इंटरनॅशनल आणि देशातल्या मानवी हक्क संघटनांच्या दबावामुळे भारतीय संसदेने १९९३ मध्ये मानवी हक्क विधेयक मांडले व १९९४ मध्ये त्याचे कायद्यात रूपांतर झाले. या कायद्यामुळे राष्ट्रीय मानवी हक्क आयोग अस्तित्वात आला. या मानवी हक्क आयोगाच्या निर्मितीच्या प्रस्तावाचे मानवी हक्क संघटनांकडून म्हणावे तसे उत्साहात स्वागत झाले नाही.

**भारतातील मानवी हक्क चळवळीची ऐतिहासिक वाटचाल**

**प्राचीन भारत**

१) वेद - सर्व माणसे समान आहेत.

२) अथर्ववेद - अन्न, पाणी यावर समान हक्क,

३) धर्मसुधार आंदोलन

४) बौध्द धर्म - अहिंसा

५) कौटिल्य - प्रजेच्या आनंदातच राजाचा आनंद

६) सम्राट अशोक - मानवी हक्कांना प्राधान्य

**मध्यकालीन भारत :-**

१) भक्ती चळवळ,

२) सूफी चळवळ,

३) बादशाह अकबराची उदारमतवादी धोरणे.

**आधुनिक भारत**

स्वातंत्र्यपूर्व काळातही भारतात मानवाधिकारासंबंधी तत्त्वे स्वीकारलेली होती. सन १८९५ ॲनी बेझंट - यांनी तयार केलेले कॉमनवेल्थ ऑफ इंडिया बिल व त्यातून स्वातंत्र्य, समता, विचारांची अभिव्यक्ती यांवर भर दिला गेला. नेहरु रिपोर्ट - १९२८ यात मूलभूत अधिकार व संरक्षण याची शिफारस करण्यात आली. अखिल भारतीय कॉंग्रेस समिती ठराव :- १९२९ - सामाजिक व आर्थिक पुनर्रचना मुद्दे मांडले होते. राष्ट्रीय कॉंग्रेस अधिवेशन १९३१,कराची - मूलभूत अधिकार ठराव पारित सप्रू समिती १९३९ - घटनेत मूलभूत हक्क जाहीरनामा असावा. पंडित नेहरु १९४६ - घटना परिषदेत ठराव सामाजिक, राजनैतिक, आर्थिक न्याय, समान संधी, कायद्यापुढे समानता, स्वातंत्र्य, दुर्बल पीडित घटकांचे संरक्षण, त्या ठरावानुसार भारतीय राज्यघटनेत मानव अधिकारांचा समावेश, १९४८च्या जाहीरनाम्यावर सही, मानवी हक्कांसाठी कायदेनिर्मिती यांचा समावेश होता.

**भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क :-** भारतीय राज्यघटनेवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या जाहिरनाम्याचा प्रभावआहे. भारतीय राज्यघटनेमध्ये नागरी व राजकीय हक्क यांचा समावेश भाग ३ मध्ये कलम १४ ते ३२ मध्ये करण्यात आला आहे तर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा समावेश भाग ४ मध्ये कलम ३६ ते ५१ मध्ये केला आहे

**मूलभूत अधिकार (नागरी व राजकीय हक्क) :-** भारतीय राज्यघटनेवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या जाहिरनाम्याचा प्रभाव असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. भारतीय राज्यघटनेमध्ये नागरी व राजकीय हक्क यांचा समावेश भाग ३ मध्ये कलम १४ ते ३२ मध्ये करण्यात आला आहे तर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा समावेश भाग ४ मध्ये कलम ३६ ते ५१ मध्ये करण्यात आला आहे.

**मार्गदर्शक तत्त्वे -( आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक) :-** भारतीय राज्यघटनेतील भाग ४ मधील कलम ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्त्वांचे विवेचन केले आहे. मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे हा समान लोकशाही स्थापनेतील एक टप्पा आहे.

**अस्पृश्यता मानवी हक्क आणि घटनात्मक तरतूद** :- भारतीय घटनेमध्ये अस्पृश्यांच्या मानवी हक्कांचे जतन करण्याकरीता काही तरतुदी केलेल्या आहेत त्या तरतुदी पुढील प्रमाणे,

१) कलम क्र. १४- धर्म, जात, लिंग, वंश, जन्मस्थान यावरुन भेदभाव केला जाणार नाही.

२) कलम क्र. १५- धर्म, जात, लिंग, वंश, जन्मस्थान यावरुन सार्वजनिक ठिकाणी भेदभाव केला जाणार नाही.

३) कलम क्र. १६-सार्वजनिक नोकऱ्या देताना शैक्षणिक पात्रतेप्रमाणे समान संधी दिली जाईल

४) कलम क्र. १७- अस्पृश्यता पाळणे कायद्यान गुन्हा ठरविण्यात आला आहे.

५) कलम क्र. २९- राज्याकडून अनुदान मिळणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये जात, धर्म, वंश, लिंग यावरुन भेदभाव करता येणार नाही.

**भारतातील सामाजिक चळवळी व मानवी हक्क :-**भारतातील सामाजिक चळवळींचा मानवी हक्कांच्या वाटचालीवर फार मोठा सामाजिक परिणाम झाला आहे. या सामाजिक चळवळी मानवी हक्काचा मजबूत पाया व दिशादर्शक म्हणून देखील नावारूपाला आलेल्या आहेत. या सामाजिक चळवळींच्या प्रभावामुळे शासनाला मानवी हक्क व मानवी प्रगती या संदर्भात विभिन्न प्रकारचे कायदे करणे भाग पडले आहे. याच कायद्यांचा महत्वपूर्ण परिणाम भारतात मानवी हक्कांच्या अंमलबजावणीवर मोठया प्रमाणावर होत आहे. महिलांबाबतच्या एखादया घटनेने, कृतीने महिलांचे सामाजिक स्थान व समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन याविषयी आजकाल फार मोठया प्रमाणात चर्चा होते. १९७५ ते १९८५ या दशकाला आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून संबोधण्यात आले होते. महिलांविषयीचा सामाजिक दृष्टिकोन मजबूत व पुरोगामी होण्यास या दशकाचा फार मोठा उपयोग झाला. या


कालखंडात महिलांवर लिहिले गेलेले साहित्य, स्त्रियांविषयीची भारतातील चळवळीचा हा प्रारंभ मानला जावू लागला. यालाच अभ्यासक स्त्रियांविषयीची चळवळ असे देखील म्हणू लागले. हे करताना स्त्रियांचे लढा देण्यासाठी एकत्र येणे आणि स्त्रियांची सामुदायिक कृती यांचा फारसा विचार केलेला दिसत नाही. स्त्रियांसबंधीचे अभ्यास आणि स्त्रियांच्या चळवळी समानार्थी वापरले जातात. अर्थात दोन्हींचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. महिलावादी चळवळीत गुंतलेल्या कार्यकर्त्यांसाठी स्त्रित्व म्हणजे काही विश्लेषण करण्याचा वा भाषणाचा विषय नाही, तर ती सामाजिक बदल घडवून आणण्याची एक पध्दती आहे.

**निष्कर्ष :**सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळात हे जसे खरे आहे की, पुरूषी वर्चस्वाला स्त्रियांचा विरोध आहे असे आपण ज्याप्रमाणे समजतो, तो पाश्चात्य शिक्षणाचा परिणाम आहे. ब्रिटीश महिलांनी स्त्रियांच्या संस्था स्थापन करण्यात आणि त्यांची उद्दिष्टे ठरविण्यात पुढाकार घेतला. गौणत्वाची कल्पना लिंग आदर्शवादाला कमीपणा आणते, ज्यामुळे स्त्रियांची परिस्थिती अजून ढासळते. पाश्चात्यवंशीय वर्चस्वाच्या भावनेमुळे पाश्चात्य देशातील स्त्रियांचा दर्जा खालावतो. साम्राज्यशाहीचे संदर्भ पुरूषांपेक्षा स्त्रीचे गौणत्वच नुसते दाखवत नाहीत तर पाश्चात्य स्त्रियांचे भारतीय स्त्रियांवरील वर्चस्वही दाखवून देतात. स्त्रियांच्या चळवळीने सांस्कृतिक प्रश्नांमध्ये खोलवर लक्ष द्यायला पाहिजे. स्त्रियांना कुटुंब, जात, धर्माच्या पलीकडे नवीन व्यक्तीमत्व प्राप्तीसाठी सांस्कृतिक तादात्म्य व सातत्य यांच्या प्रश्नाला पकडून ठेवेले पाहिजे. आपल्या सांस्कृतिक वारशामध्ये स्त्रियांसाठी कोणत्या गोष्टी जुलमी आणि कोणत्या गोष्टी नाशकारी आहेत, हे समजून घेणे तुलनात्मक दृष्टया सोपे आहे. उथळपणा टाळायचा असेल तर आपल्या सांस्कृतिक परंपरेच्या मानवी मूल्यांचा आणि विरोधी मूल्यांचा सुध्दा विचार झाला पाहिजे. आपल्या परंपरा व संस्कृती मध्ये स्त्रियांचे महत्व उध्दवस्त करणारे अनेक घटक आहेत. अशा घटकांना बाजूला करून ती ताकद परंपरा बदलाच्या कार्यात वापरण्यात आली पाहिजे. जर आपण शक्तीकेंद्रे शोधून काढू शकलो व नवनिर्मितीच्या दृष्टिने वापरू शकलो तर आपल्या सांस्कृतिक परंपरेत प्रचंड क्षमता आहे. जिच्यामुळे प्रतिक्रियात्मक व स्त्रीविरोधी कल्पनांशी लढा देवू शकू.

गत तीन दशकात स्त्रियांच्या स्वायत्त गटांचे असलेले संघर्ष स्त्री समस्यांभोवती काम करत परिणाम घडवून आणत आहेत. त्यांच्या मुक्तीसाठी अनेक प्रश्नांना हात घालतात. बलात्कार, कामाच्या ठिकाणी लैंगिकछळ, कुटुंब, सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांविरूध्दची हिंसा यासारख्या समस्यावर संघर्ष होत आहेत.भारताची राज्यघटनेच्या लिखाण प्रारंभानंतर दोन वर्षांनी मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामास्वीकारण्यात आला. मात्र २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताच्या घटना समितीने जागतिक जाहीरनामा स्वीकारला. त्यातील प्रत्येक कलमाचे प्रतिंबब भारताच्या राज्यघटनेत दिसते.मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील वेगवेगळी कलमे तसेच भारतीय राज्यघटना व कायद्यातील तरतुदींमधील साम्यस्थळे दाखवतो.

## संदर्भ सूची

1) Anuja Ram, Society of India, Juster Ealfer Publication, New Delhi,March 2003
2) Doyle Michael, Globalization of Human Right, Stockhome Publication, Delhi, Jun 2006
3) Shabbir Mohamad, Quest of Human Right, Sage Publication, Hydrabad, 2008
४) कुलकर्णी पी. के., भारतातील समाजशास्त्र, लोकवाङ्:मय, प्रकाशन, मुंबई, २००५


भारतीय लोकशाही
(सिद्धांत आणि व्यवहार)
Democracy
संपादक
डॉ. संजय बी. गोरे

# भारतीय लोकशाही

## (सिद्धांत आणि व्यवहार )

संपादक
डॉ. संजय बी. गोरे

आधार पब्लिकेशन्स, अमरावती

भारतीय लोकशाही
(सिद्धांत आणि व्यवहार)

■ **डॉ. संजय बी. गोरे**

■ प्रथम आवृत्ती – **दि. २६ जानेवारी २०२२**

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN-** 978-93-91305-80-2

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पु.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | मानवी अधिकार आणि भारतीय संविधान | डॉ. सय्यद आर. आर. | 1 |
| 2 | भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका आणि लोकशाही | डॉ. तानाजी माने | 7 |
| 3 | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | सौ. प्राची चैतन्य पाटील | 18 |
| 4 | भारतीय लोकशाही आणि आरक्षण धोरण | प्रा. संजय मारोतराव देबडे | 25 |
| 5 | स्त्री सुरक्षा व भारतीय लोकशाही | प्रा. डॉ. प्रतिभा गडवे – दातिर | 33 |
| 6 | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | प्रा. विजय शामराव कांडलकर | 42 |
| 7 | भारतीय संविधान आणि बालकामगार | डॉ.प्रकर्ष सु. देशमुख | 51 |
| 8 | भारतीय लोकशाहीत राजकिय चळवळींची भूमिका | श्री. कमलाकर सदानंद राऊत | 59 |
| 9 | भारतीय संविधान आणि सामाजिक न्याय | प्रा.रमेश एकनाथ भारूडकर | 66 |
| 10 | 'पूर्वेकडे पहा' धोरण-एक अभ्यास (भारत-चीन संबंधांच्या संदर्भात) | प्रा. संतोष भावार्थे | 73 |
| 11 | वर्तमान परिवेश में डॉ. आम्बेडकर की प्रासंगिकता | निघोंट अर्चना महादेवराव | 79 |
| 12 | बाल कामगार समस्या आणि उपाययोजना | डॉ. कल्पना मा. बंडिवार | 88 |
| 13 | भारतीय लोकशाही : मूलभूत हक्क व मानवी हक्क | प्रा. एन. ए. पाटील | 93 |

| | | |
|---|---|---|
| 14 | भारतातील सामाजिक न्यायाचा वैचारिक विकास<br>**धिरज सतिषराव नाईक** | 99 |
| 15 | ''भारतीय लोकशाहीत महिलांचा राजकीय सहभाग''<br>प्रा. डॉ. निता सोमनाथे | 108 |
| 16 | भारतीय राष्ट्रवादाच्या अनुषंगाने धर्मनिरपेक्षतेच्या जडणघडणीत महात्मा गांधी व वि. दा. सावरकर यांच्या विचारांचे योगदान<br>**अमोल भा. सातपुते** | 115 |
| 17 | भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्याला सांप्रदायिकतेचा धोका<br>प्रा. डॉ. पद्‌माकर प्रेमदास दारोंडे | 122 |
| 18 | भारतीय संविधानाची प्रास्ताविका आणि लोकशाही<br>प्रा. डॉ.अशोक रामसिंग वसावे | 132 |
| 19 | भारतीय संविधानातील स्वातंत्र्य या मूलभूत हक्काची घटनात्मक तरतूद<br>**डॉ. रजनी अ. बोरोळे** | 141 |
| 20 | बाल कामगार सामाजिक समस्या<br>डॉ.रविंद्र सहारे | 149 |
| 21 | Preamble of Indian constitution and democracy<br>**Dr Kavita sonkamble** | 160 |
| 22 | ग्रामपंचायत सदस्य लोकशाहीचा संरक्षक<br>**डॉ. योगीराज एस. उरकुडे** | 167 |
| 23 | भारतीय लोकशाहीच्या वाटचालीचा मागोवा<br>प्रा. डॉ. आनंदराव रा. शिंदे | 172 |
| 24 | भारतातील कृषी विकासाच्या योजनांचा अभ्यास<br>**ज्ञानेश्वर बापूराव जांभुळे** | 180 |
| 25 | भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास व स्वरुप<br>**डॉ. ए. एस. करडे** | 186 |
| 26 | सकारात्मक कृती धोरणाचे भारत – अमेरिका संदर्भात विश्लेषण<br>डॉ.आय.पी.कोकणे | 192 |

# भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास व स्वरुप

डॉ. ए. एस. करडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय,
वाशी ता. वाशी जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

विषयाचे महत्व –

भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे ही स्वातंत्र्य आंदोलन काळातच विकसीत झालेली आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय परराष्ट्र धोरणाची जी औपचारिक उद्दिष्टे निश्चीत करण्यात आली, त्यांची सुरुवात स्वातंत्र्य चळवळीच्या काळातच झाली होती. परिणामी भारताच्या परराष्ट्र धोरणाचा इतिहास तपासताना गेल्या १०० वर्षाचा सखोल अभ्यास करावा लागतो. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात भारताने घेतलेल्या विविध निर्णयांचा व वेगवेगळया भूमिकांचा सविस्तर व सखोल अभ्यास करावा लागतो.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारताच्या परराष्ट्र धोरणावर ब्रिटीश राजकारण व परंपरेचा प्रभाव होता. इंग्लंड मधील संसदीय लोकशाही, राजनयाची प्रशासकीय संरचना, उदारमतवादी विचार, लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाचे उद्दिष्ठ, परराष्ट्र धोरण निश्चीत करण्याची संस्थात्मक प्रक्रिया व इतर बाबीचा समावेश झाल्याने भारताचा जागतिक राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निश्चीतच बदलला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर यापैकी अनेक गोष्टी भारताच्या राजकारणात परराष्ट्र धोरणासाठी आणि परराष्ट्र धोरण र्निमीती व निश्चीतीसाठी मार्गदर्शक ठरल्या आहेत. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या र्निमीतीची जी प्रक्रिया आहे तिच्यावर ब्रिटीश परंपरेचा प्रभाव स्पष्ट जाणवतो, त्यामागे मुख्य कारण म्हणजे सुरुवातीच्या काळापासून परराष्ट्र धोरण र्निमीतीच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होणारे प्रशासकीय अधिकारी हे ब्रिटीश परंपरेच्या पठडीत तयार झालेले होते. त्यांना मिळालेले प्रशिक्षण हे ब्रिटीश परंपरेचे होते. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित नेहरुंच्या विचारांवर ब्रिटीश उदारमतवादी विचार परंपरेचा प्रभाव होता. भारताने राष्ट्रकुल संघटनेने स्विकारलेले सदस्यत्व भारताच्या परराष्ट्र धोरणावर ब्रिटीशांचा प्रभाव स्पष्ट करते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारताच्या परराष्ट्र धोरणाची विभागणी दोन कालखंडामध्ये करता येते. यातील पहिला कालखंड सन १८८५ ते १९२० असा आहे, तर दुसरा कालखंड १९२० ते १९४७ अशी विभागणी करता येईल. या शोधनिबंधाचा हेतू हा १९९० नंतर भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिकेचा अभ्यास करणे हा आहे. त्यामूळे १९९० पूर्वीच्या दोन टप्प्याच्या आधारावरच १९९० नंतरच्या राजकारणाचा अभ्यास करता येईल. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस स्थापनेनंतर परराष्ट्र धोरण व आंतरराष्ट्रीय राजकारणासंबंधी भारताच्या तत्कालीन राजकीय नेतृत्वाने आपले विचार स्पष्ट करण्यास सुरुवात केली. या काळात भारतीय नेतृत्वाने ब्रिटीशांच्या धोरणातील दोन मुद्यांवर प्रामुख्याने टीका केली. पहिले म्हणजे ब्रिटीशांचे युध्दखोर

धोरण आणि दुसरे म्हणजे भारताच्या शेजारील राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात केलेला हस्तक्षेप. १८८५ साली ब्रिटीशांनी ब्रम्हदेशांवर केलेल्या आक्र मणाचा राष्ट्रीय कॉंग्रेसने निषेध केला. तसेच सन १८९२ साली राष्ट्रीय कॉंग्रेसने भारताच्या भौगोलिक सीमारेषांवर ब्रिटीशांच्या वाढत्या लष्करी कारवाया व हालचालींना टीकेचे लक्ष्य केले. भारताच्या शेजारील तिबेट, अफगाणिस्तानच्या कारभारात ब्रिटीशांच्या हस्तक्षेपावर राष्ट्रीय कॉंग्रेसने निषेध नोदविला.[२] राष्ट्रीय कॉंग्रेसने याच धोरणाच्या आधारावर स्वातंत्र्योतर काळात भारताचे पंचशील धोरण विकसीत करण्यात आले. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारताचा (ब्रिटीश नियंत्रीत भारताचा) परराष्ट्र धोरण व आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा मर्यादित आणि हेतूरहित होता. याचा परिणाम म्हणून या काळात भारतीय परराष्ट्र धोरणाविषयी कॉंग्रेसकडून वेळोवेळी जी मते व्यक्त केली गेली, ती प्रामुख्याने भारत आणि भारताच्या शेजारील राष्ट्रांविषयी होती. राजकारणातील व्दिपक्षीय संबंधांना गृहित धरूनच ही मते व्यक्त केलेली होती. येथे एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे, ती म्हणजे स्वातंत्र्योत्तरकाळात भारताचे परराष्ट्र धोरण अमूलाग्र बदलले व पुढील तत्वांवर निश्चीत केले गेले.

१)युध्दाला भारताचा विरोध आहे व शांततेच्या माध्यमातून राजकीय संघर्ष सोडविणे.

२)इतर राष्ट्रांच्या अंतर्गत राज्य कारभरात हस्तक्षेप न करणे.

या दोन्ही तत्वांशी भारताच्या परराष्ट्र धोरणाची बांधीलकी सुरुवातीपासूनच आहे. ही दोन तत्वे भारताच्या पंचशील धोरणाचा आधार बनली. आदर्शवादी दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याची मानसिकता १९ व्या शतकापासूनच विकसीत होत गेली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या विकासाचा दुसरा कालखंड हा दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर सुरु होता. या कालखंडात आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याचा भारतीयांचा दृष्टिकोन व्यापक व प्रगल्भ झालेला जाणवतो. वेगवेगळया आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये भारताचा सहभाग वाढविला. तसेच आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर भारतीय नेतृत्वाने आपली भूमिका स्पष्ट व ठामपणे घ्यायला सुरुवात केली. आंतरराष्ट्रीय राजकारण आणि परराष्ट्र धोरणाविषयी भारतीय नेत्यांमध्ये संघटितपणा, एकवाक्यता व सुत्रबध्दता आली. पहिल्या कालखंडात राष्ट्रीय कॉंग्रेसचा विश्वदृष्टिकोन केवळ भारत आणि त्याच्या शेजारील राष्ट्रे यापुरताच मर्यादीत होता. मात्र दुसऱ्या कालखंडात भारतीयांचा विश्वदृष्टिकोन हा व्यापक बनला होता हे राष्ट्रीय कॉंग्रेसने वेळोवेळी मंजूर केलेल्या विविध राजकीय ठरावांवरून स्पष्ट होते. जसे की, आयरीश देशातील लोकांच्या स्वातंत्र्य चळवळीशी सहानूभूती व समर्थन दर्शविणारा राष्ट्रीय कॉंग्रेसचा १९२० चा राजकीय ठराव हे भारतीयांच्या व्यापक दृष्टिकोनाचे उतम उदाहरण आहे. १९२१ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस समितीच्या बैठकीत परराष्ट्र धोरणासंबंधी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयांतर्गत भारत हा जगातील प्रत्येक राष्ट्राशी शांततेचे, मैत्रीचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करेल. भारतीयांचा वैश्विक दृष्टिकोन व्यापक होण्याचे कारण म्हणजे व्हर्सायच्या तहावर भारताने केलेली स्वाक्षरी व राष्ट्र संघाचे भारताने स्विकारलेले सदस्यत्व होय. भारताला अशा प्रकारच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेचा सभासद होण्याची संधी मिळाली होती. १९२८

मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कलकता अधिवेशनात स्वतंत्र परराष्ट्र विभाग स्थापन करण्याचा व त्याव्दारे सर्व राष्ट्रांशी सहकार्याचे संबंध स्थापण्याचा निर्णय झाला.[२]

दुसऱ्या कालखंडात भारतीय परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात कॉंग्रेसने घेतलेला आणखी एक महत्वपूर्ण निर्णय म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला वसाहतवादविरोधी आंतरराष्ट्रीय चळवळीशी जोडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येवू लागला. विसाव्या शतकाच्या पुर्वार्धापासूनच अनेक आशियाई राष्ट्रांमधून वसाहतवादाविरुध्द तीव्र आंदोलने झाली. राष्ट्रीय कॉंग्रेसने या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. इजिप्त, सीरीया, इराक, पॅलेस्टाईनमध्ये पश्चिमी वसाहतवादाविरोधात जी आंदोलने चालली होती, त्या आंदोलनालादेखील राष्ट्रीय कॉंग्रेसने पाठिंबा जाहीर दिला होता. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही याच वसाहतवादाविरोधी आंतरराष्ट्रीय चळवळीचा एक भाग असल्याचे पंडित नेहरु यांनी देखील मान्य केले होते. पंडित नेहरुच्या प्रयत्नामुळेच वसाहतवादाच्या विरोधात लढणारे सर्वच देश एकत्र आले होते हे देखील याचे महत्वपूर्ण फलित होते. आाशियाई व आफ्रिकी राष्ट्रांना संघटित करुन परस्पर सहकार्याच्या माध्यमातून सामूहिक विकास साधण्याचे स्वातंत्र्योतर काळातील भारतीय परराष्ट्र धोरण याच काळात विकसीत झाले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला वसाहतवादाच्या विरोधात जोडण्याचा पहिला प्रयत्न पंडित नेहरु यांनी १९२७ साली ब्रुसेल्स येथील वसाहतवादविरोधी परिषदेमध्ये केला.[३] वसाहतवाद विरोधाबरोबरच व्यक्ती स्वातंत्र्याची पायमल्ली करणाऱ्या हुकूमशाही प्रवृतीचा देखील राष्ट्रीय कॉंग्रेसने विविध ठरावाव्दारे निषेध केलेला होता. दुसऱ्या कालखंडात भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ठे निश्चीत झाली. त्यातील काही उद्दिष्ठे पुढीलप्रमाणे,

१)वसाहतवाद, वंशवाद, हुकूमशाही व युध्दाचा विरोध

२)उदारमतवादी लोकशाहीचा आदर करणे.

३)आफ्रो- आशियाई राष्ट्रांना संघटित करुन सामूहिक विकास करणे.

४) सर्व राष्ट्रांशी मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे.

५) आंतराष्ट्रीय प्रश्न शांतता आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडविणे.

६) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापनेला समर्थन देणे.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतीय परराष्ट्र धोरणाच्या विकासाच्या दुसऱ्या कालखंडात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या भारतीयांच्या आदर्शवादी दृष्टिकोनाचा स्वातंत्र्योतर काळातील परराष्ट्र धोरणावर प्रभाव स्पष्ट जाणवतो. भारताचे परराष्ट्र धोरण आदर्शवादी होण्यात महात्मा गांधीचा अहिंसावाद, रविंद्रनाथ टागोर व न्या. गोपाळ कृष्ण गोखलेचा उदारमतवादी आंतरराष्ट्रीयवाद आणि पंडित नेहरु यांचा लोकशाही समाजवाद प्रमुख आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या हितसंबंधाचे रक्षण कसे करायचे, भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न कसा सोडवायचा याविषयी नेहरु ची भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच स्पष्ट होती. दुसऱ्या कालखंडात अहिंसावाद, उदारमतवाद आणि लोकशाही समाजवाद या विचारसरणीनी भारताचे परराष्ट्र धोरण प्रभावित आहे. या धोरणाच्या आधारावर भारताच्या

परराष्ट्र धोरणाची वाटचाल चालू आहे. याचा परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणावर पुढील बाबीमधून जाणवतो.

१) सतेच्या राजकारणाला विरोध करणे व राष्ट्रीय हितसंबंध वृध्दीकडे लक्ष देणे.

२) विभागीय आणि प्रादेशिक पातळीवर हितसंबंध वृध्दीकडे लक्ष देणे.

३) सत्तासमतोलाच्या राजकारणापेक्षा सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांवर भर देणे.

४) आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणणे

५) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितेसाठी आंतरराष्ट्रीय संघटना निंमीतीला समर्थन देणे.

याच आदर्शवादी तत्वांमुळे दुसऱ्या महायुध्दानंतर नेतृत्वासाठी अमेरीका व रशिया या दोन महासतांमधील शीतयुध्दात भारताने रस दाखविला नाही. सतेच्या राजकारणावर आधारित शीतयुध्दापासून स्वतःला अलिप्त ठेवून आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून विकासाचे धोरण भारताने अवलंबिले. शीतयुध्दाचे राजकारण व अलिप्ततावादी धोरणाविषयी नेहरु म्हणतात की, When we say our policy is one f non-alignment, obviously we mean non-alignment with military blocs. It is not a negative policy. It is positive one, a definite one and, I hope a dynamic one. But in so far as military blocs concerned, we do not align ourselves with either block.[४] २१ सप्टेबर १९४६ रोजी पंडित नेहरु यांनी परराष्ट्र धोरणाची प्रमुख आधारभूत तत्वे घोषित केली व आशा व्यक्त केली की, या तत्वांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात अमूलाग्र बदल होईल व भारत आंतरराष्ट्रीय राजकारणात जबाबदारी पार पाडू शकेल याबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. ती तत्वे पुढीलप्रमाणे,

१) भारत संयुक्त राष्ट्र संघटनेला पूर्ण समर्थन आणि सहकार्य देईल., संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेशी भारत बांधील असेल. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यात भारताचा सक्रि य सहभाग असेल.

२) भारत स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखण्याच्या बाजूचा असेल. परराष्ट्र धोरण क्षेत्रातील निर्णय हा बाह्य राष्ट्रांच्या दबावात घेतला जाणार नाही. सत्तेच्या राजकारणाला भारत विरोध करेल. भारत स्वतःला कोणत्याही लष्करी गटात समाविष्ट करून घेणार नाही.

३) भारत शीतयुध्दाच्या राजकारणामधून निर्माण झालेल्या गटांत समाविष्ट होणार नाही.

४) भारत वसाहतवादाचा विरोध करेल व वसाहतवादविरोधी संघर्ष करणाऱ्या देशास पाठिंबा देईल

५) सर्व शांतताप्रिय राष्ट्रांबरोबर भारताचे मैत्रीपुर्ण आणि सहकार्याचे संबंध असतील.

६) शेजारी राष्ट्रे व महासत्ताबरोबर भारताचे सहकार्याचे संबंध असतील.

७) या राष्ट्रांच्या सहकार्यातून भारत आपला आर्थिक आणि सामाजिक विकास साधेल.

८) भारत वंशवादाचा आणि सर्वप्रकारच्या शोषणाचा तीव्र विरोध करेल.

स्वातंत्र्यपूर्वीपासूनच आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निश्चीत झाला. आंतरराष्ट्रीय राजकारण आणि सुरक्षेच्या प्रश्नाकडे पाहण्याचा भारतीय नेतृत्वाचा दृष्टिकोन महत्वपूर्ण स्पष्ट होता. हा दृष्टिकोन स्पष्ट करताना पंडित नेहरु यांनी म्हटले होते की, Security

can be obtained in many ways. The normal idea it that security is protected by armies. This is only party true, it is equally true that security is protected by politics. A deliberate policy of friendship with other countries.[५] स्वातंत्र्यपूर्व काळात परराष्ट्र धोरणाची जी तत्वे निश्चीत करण्यात आली होती, त्या तत्वांमध्ये स्वातंत्र्योतर काळात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आला नाही. आज देखील परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात जे महत्वपूर्ण निर्णय घेतले ते या तत्वांवर आधारलेले आहेत. याचा प्रत्यय आपणास पुढील घटनांवरून लक्षात येतो. यात प्रामुख्याने, अलिप्ततावादी संघटनेच्या स्थापनेत भारताचा पुढाकार, आफ्रो- आशियाई राष्ट्रांच्या एकीकरणासाठी भारताचे प्रयत्न, शेजारील राष्ट्रांबरोबर तसेच महासतांबरोबर भारताने प्रस्थापित केलेले व्दिपक्षीय पातळीवरील संबंध, अण्वस्त्रांच्या निर्मीतीला विरोध, दक्षिण आफ्रिकेतील वंशवादाचे समर्थन करणाऱ्या शासनावर भारताचा बहिष्कार, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतीसेनेत भारताचा असलेला सहभाग, मानव अधिकार, महिलांचे अधिकार, बालक अधिकार, गुलामगिरीवर बंधने यासंबंधी विविध आंतरराष्ट्रीय ठरावांना भारताने दिलेली मंजूरी इ. महत्वपूर्ण निर्णय हे परराष्ट्र धोरणाच्या याच तत्वांवर आधारलेले आहेत. या तत्वांमध्ये १९९० च्या दशकामध्ये काही नवीन तत्वांची भर पडली. ही नवीन तत्वे बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीला गृहीत धरून निश्चीत करण्यात आली. विशेष म्हणजे या नवीन तत्वांनी जुन्या तत्वांची जागा घेतली नाही, जुन्या तत्वांचे अस्तित्व कायम ठेवूनच आजही परराष्ट्र धोरणाचा विचार केला जातो. जागतिक शांतता व सहकार्य, निःशस्त्रीकरण, सामूहिक सुरक्षितता, आत्मनिर्भरता, स्वतंत्र परराष्ट्र धोरण ही तत्वे आज देखील उपयुक्त असून या तत्वांचे भारताच्या परराष्ट्र धोरणाला मार्गदर्शन होत आहे.

**निष्कर्ष :**

१) स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारताच्या परराष्ट्र धोरणावर ब्रिटीश राजकारण व परंपरेचा प्रभाव होता.

२) आंतरराष्ट्रीय राजकारण व सुरक्षेच्या प्रश्नाकडे पाहण्याचा भारतीय नेतृत्वाचा दृष्टिकोन महत्वपूर्ण स्पष्ट होता.

३) स्वातंत्र्यपूर्व काळात परराष्ट्र धोरणाची जी तत्वे निश्चीत करण्यात आली होती, या तत्वांमध्ये स्वातंत्र्योतर काळात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आला नाही.

४) भारत संयुक्त राष्ट्र संघटनेला पूर्ण समर्थन आणि सहकार्य देत आहे.

५) भारताचा वसाहतवादास कायमच विरोध राहिला आहे.

६) स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण अहिंसावाद, उदारमतवाद, लोकशाही समाजवाद या विचारसरणीनी प्रभावित आहे.


संदर्भ सूची :-

१) Aadhikari Goutam, India and America: Estranged No More, History Pub., Penecelviya, 2011

२)Chopra V. D. Indias Foreign Policy in the 21st Century, Kalpaj Publication, Delhi, 2006

३) Catzenstin Peter, Asian regionalism in comparative perspective, Cornell University Press Publication, Ithka (London), 1997.

४) Columbus Wolf, Introduction to International relations, Prentais Hall Pub., Delhi, 2000.



# गांधीवादी विचार

## (स्वरुप आणि प्रासंगिकता)

संपादक

डॉ. संजय पी. धनवटे

# गांधीवादी विचार

## स्वरुप आणि प्रासंगिकता

संपादक
डॉ. संजय पी. धनवटे

आधार नॅशनल पब्लिकेशन, अमरावती.

# गांधीवादी विचार

## स्वरुप आणि प्रासंगिकता

■ डॉ. संजय पी. धनवटे

■ प्रथम आवृत्ती – दि. ०२ ऑक्टोबर २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार नॅशनल पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/- रु

ISBN- 978-93-91305-68-0

टिप - सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# Index



| S.No | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | महात्मा गांधीजीचे सत्य आणि अहिंसेसबंधी विचार<br>**सहा. प्रा. इनकर विक्रम सोनाजी** | 1 |
| 2 | गांधीजींच्या विचारातून विश्वस्त संकल्पना<br>डॉ. महेन्द्र पांडुरंगजी गावंडे | 5 |
| 3 | महात्मा गांधींजींच्या विचारांची प्रासंगिकता : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख** | 14 |
| 4 | महिला-सक्षमीकरणाबाबत म.गांधी यांचे विचार -एक सिंहावलोकन<br>**प्रा.श्रीकृष्ण बी.बोढे** | 23 |
| 5 | महात्मा गांधीचा शिक्षण विषयक दृष्टिकोन<br>डॉ. गजानन संतोषराव कुबडे | 31 |
| 6 | महात्मा गांधीजी यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोण<br>प्रा. डॉ. राजेंद्रप्रसाद पटले | 36 |
| 7 | **महात्मा गांधीच्या विचारांची सद्यःकालीन उपयुक्तता**<br>**डॉं. ए. एस. करडे** | 43 |
| 8 | अस्पृश्यता निर्मुलन हेतू महात्मा गांधी यांचे विचार आणि कर्तुत्व<br>**Dr.Shankar R.Gujarkar** | 48 |
| 9 | महात्मा गांधी यांचे खादी विषयक विचार<br>प्रविणकुमार मधुसूदन लोणारे | 53 |
| 10 | महात्मा गांधींचे अहिंसेसंबंधी विचार<br>डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड | 61 |
| 11 | महात्मा गांधी यांचे महिला सक्षमीकरण विषयक विचार व योगदान<br>डॉ. अरूणा एस. देवगडे | 68 |

# महात्मा गांधीच्या विचारांची सद्य:कालीन उपयुक्तता

डॉ. ए. एस. करडे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, बार्शी

ता. बार्शी जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

**विषयाचे महत्व**

१९१४ साली स्मट्स यांनी आणि १९४७ साली अॅटली यांनी घेतलेल्या निर्णयामागे गांधींच्या शांततामय चळवळीखेरीज, इतर अनेक कारणे होती. तरीही गांधीची अहिंसेवरील निष्ठा, त्यांचा विरोधकांवरील विश्वास आणि त्यांच्यावर आपला निर्णय न लादता त्यांना आपल्याबरोबर न्याय्य निर्णयाकडे घेवून जाणे, ही या दोन्ही महान लढयाची प्रमुख वैशिष्टये होती. तुमच्या शत्रूवर विजय मिळवायचा असेल तर तो प्रेमाने मिळवा हे त्याचे मुख्य तत्व होते.११ सप्टेंबर, १९०६ ची संध्याकाळ होती, जोहान्सबर्गच्या एम्पायर थिएटरमध्ये बॅरिस्टर मोहनदास करमचंद गांधी मंचावर ऐकत बसले होते. थिएटर दुपारपासूनच हिंदी रहिवाशांनी खचाखच भरले हो. चौथा ठराव मांडण्याची वेळ येईपर्यंत बराच उशीर झाला होता. पुढे 'जेल ठराव' म्हणून ओळखला गेलेला हा ठराव महात्मा गांधीनीच तयार केलेला होता. आपले ठराव मांडले जाताना ऐकत राहणे, हा काही गांधीना नवीन अनुभव नव्हता.

**महात्मा गांधीचे विचार** :१९०३ मध्ये गांधीनी ट्रान्सवालचे रहिवाशी होण्याचे ठरवले तेव्हापासून तर सर्वधर्म पंथाच्या राजकीय ठराव गांधीकडेच असायचे. ट्रान्सवालमधील ब्रिटीश राजवटीने एशियन लॉ अमेंडमेंट ऑर्डिनन्स २४ ऑगस्टला गॅझेटमध्ये प्रकाशीत करण्यात आला होता.[१] ट्रान्सवालमधील सर्व आशियाई रहिवाशांना हळूहळू हाकलून देवून हा प्रांत सर्वस्वी गोऱ्यांचाच व्हावा, ही योजना होती. त्यासाठी पुन्हा आशियाई लोकांनी नोंदणी करावी ती सुध्दा गुन्हेगारांकडून घेतले जातात तसे दहाही बोटांचे ठसे देवून. असे या प्रस्तावित कायद्यात सांगितले होते. हा कायदा संमत झाला असता तर आशियाई लोकांचा दर्जा काफिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळया जमातीपेक्षा हीन ठरला असता. या चौथ्या ठरावाचा उद्देश स्पष्ट होता. हा नवीन कायदा संमत न करण्याची या सभेने केलेली नम्र विनंती जर लेजिस्लेटिव्ह कौन्सिल आणि स्थानिक राज्यकर्ते यांनी मान्य केली नाही. लंडनच्या साम्राज्यवादी सरकारनेही या कायद्याला संमती दिली, तर मग ब्रिटीश परंपरेला न शोभणाऱ्या या कायद्याच्या अटी न पाळता सभेतील प्रत्येकजण कायदा मोडून तुरुंगात जाण्याचे मान्य करुन या कायद्याच्या तरतुदी किती अन्यायकारक आहेत, हे स्पष्टपणे दाखवून देतील. सिव्हील डिसोबेडियन्सचे हे महत्वाचे पाऊल होते.हा ठराव संमत झाल्यानंतर गांधी लंडनला गेले. त्यावेळी तेथे मताधिकारासाठी तेथील महिलांनी केलेली चळवळ त्यांनी पाहिली होती. हेन्री डेव्हिड थोरो या अमेरिकन विचारवंताचे विचार वाचून त्यांच्या निर्धाराला बळकटी प्राप्त झाली. इंग्लंडमधील चळवळीला सिव्हिल डिसोबेडियन्स म्हटले जात होते. परंतु सफ्रेजेस भगिनींना

(मताधिकारासाठी लढणाऱ्या स्त्रिया) हिंसेचे वावडे नव्हते. त्यामुळे वर्षभरानंतर गांधींनी आपल्या चळवळीला सत्याग्रह हे वेगळे नाव निवडले. नोव्हेंबर १९०७ मध्ये रामसुंदर पंडित या पुजाऱ्याने सर्वात आधी कायदा मोडून तुरुंगवास पत्करला.[2] गांधींना कैद झाली. गांधींनी गुन्हा कबूल करुन आपल्याला जास्तीत जास्त सजा द्यावी, अशी विनंती केली. ते स्वतः वकील होते, त्याकाळी वकील हा कोर्टाचा एक ऑफिसर मानला जायचा.[3] महात्मा गांधींना शिक्षा करणे ही न्यायाधिशाच्या दृष्टिने नामुष्की होती. हे सर्व घडेपर्यंत जेल ठरावाला १६ महिने उलटून गेले होते. तरीही ११ सप्टेंबर, १९०६ हा सत्याग्रह जन्म दिन मानणे योग्य ठरेल. शंभर वर्षापूर्वी संमत झालेल्या या चौथ्या ठरावामुळे सत्याग्रह या संकल्पनेचा विचार करताना तुरुंगवास ह्या पारंपारिक शस्त्राला पर्यायी शस्त्र गांधीनी शोधून काढले. यामुळे ११ सप्टेंबरच्या पहिल्या तीन ठरावातील महत्वाचे पैलू विसरले जातात. या चार ही ठरावांचे उद्दिष्ट होते, ते प्रतिस्पर्ध्याला आपल्या मुख्य तत्वांची प्रकर्षाने जाणीव करुन देणे. प्रतिस्पर्ध्याची विशीष्ट धारणा आहे, हे गांधीनी अगोदर लक्षात घेतले होते. ती लक्षात घेवून प्रतिस्पर्ध्याला त्याच्या धारणेतील अन्याय आणि आपल्या तत्वांतील सत्य लक्षात आणून द्यायचे होते. त्यासाठी सर्व शांततापूर्ण मार्गांचा अवलंब करणे आवश्यक होते. पिटीशनमधून आपली बाजू मांडणे, प्रतिनिधी मंडळ नेवून प्रतिस्पर्ध्याची भेट घेणे, त्याच्याशी वाटाघाटी करणे, त्याचवेळी जनमत तयार करणे, लोकशिक्षण अंगीकारणे आणि निरनिराळया स्तरांवरील अधिकारी व्यक्तींकडे न्यायाची याचना करणे, प्रतिस्पर्ध्याचे म्हणणे ऐकून घेणे आणि स्वतःच्या भूमिकेतील सत्य न सोडता तपशिलांच्या बाबतीत वेळप्रसंगी तडजोड करणे, हा देखील या प्रक्रियेचा भाग होता.

विशीष्ट प्रसंगी कोणताही कायदा वंशभेदावर आधारीत नसावा, हे तत्व होते. राणींने १८५८ साली केलेल्या जाहीरनाम्यात सर्व ब्रिटीश प्रजेला समान वागणूक मिळेल असे आश्वासन दिले होते ते पाळले जाणे आवश्यक होते. ट्रान्सवाल आणि इतर ब्रिटीश कॉलनीच्या जडणघडणीत युरोपियनांप्रमाणे हिंदी प्रजेलाही संधी मिळणे आवश्यक होते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी रहिवाशांनी आपली कर्तव्ये कसोशीने पाळली होती. ट्रान्सवालमधील लेजिस्लेटिव्ह कौन्सीलने प्रस्तावित कायदा संमत करु नये आणि त्यांनी तसे केल्यास ब्रिटीश शासनाने प्रिटोरीया किंवा लंडन येथील राज्यकर्त्यांनी या न्याय मागण्या मान्य केल्या नाही तर आत्मक्लेशावर आधारीत शांततामय चळवळीने विरोध करावयाचा होता. सत्याग्रह हे एक प्रभावी अस्त्र आहे, धडक प्रतिकाराची ती एक अत्यंत जबरदस्त पध्दती आहे. या विश्वासाने सत्याग्रह करायचा होता. पारंपरीक शस्त्रास्त्रे उपलब्ध नाहीत म्हणून नव्हे. शांततामय प्रतिकार म्हणजे शांततामय जबरदस्ती नव्हे, तर प्रतिस्पर्ध्याला वळवून आपल्याला न्याय्य वाटणारा निर्णय घ्यायला लावणे, हे होते. परंतु दुसऱ्या दिवशी ट्रान्सवाल असेंम्बलीमध्ये हा ब्लॅक ॲक्ट संमत करण्यात आला. सर्वच प्रतिनिधी युरोपीयन आणि त्यांची एकच काळजी. त्यानंतर ११ सप्टेंबरपासून नोव्हेंबर १९०७ पासून ट्रान्सवालचे राज्यकर्ते आणि इंग्लंडमधील सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर कॉलनीज् यांना समजाविण्याचे अनेक प्रयत्न झाले. गांधी व हाजी वजीर अली प्रतिनिधी म्हणून लंडनला जावून आले. त्यांच्या प्रयत्नाला यश मिळाल्याचा भास निर्माण

करण्यात आला. पण ब्रिटीश शासनाने जरी हा कायदा नामंजूर केला तरी ट्रान्सवाल स्वतंत्र झाला की असाच कायदा पुन्हा करा, असा कानमंत्रही दिला. १९०७ च्या सुरुवातीला ट्रान्सवाल स्वतंत्र होताच हाच कायदा नव्याने संमत करण्यात आला.[४] नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाची स्वायत्तता राखणे, या उदारमतवादी धोरणाचा भाग म्हणून ब्रिटीश शासनाने त्यास मंजूरी दिली होती. वांशिक समानता आणि साम्राज्याचे आपल्या हिंदी प्रजेसंबंधीचे कर्तव्य या लिबरल तत्वांकडे दुर्लक्ष करण्यात आले. ट्रान्सवालमध्ये बोथा आणि स्मट्स हे मूळ बोअर नेते निवडून आले. त्यांचा तर वंशभेदाविषयी आग्रह होता. सारे प्रयत्न व्यर्थ झाले. नंतर सत्याग्रहाचे अंतिम पाऊल उचलले गेले.

प्रतिस्पर्ध्यावर विश्वास हे एक जगावेगळे तत्व होते. जनरल स्मट्स यांनी अनेक वेळा विश्वासघात करु नही गांधीनी त्यांच्यावर अविश्वास दाखविला नाही. आवश्यकता भासल्यास आपण कधीही पुन्हा सत्याग्रहाचे अस्त्र उपसू शकतो, यावर त्यांवी श्रध्दा होती. सत्याग्रहाची धार ते अस्त्र पुन्हा वापरल्यामुळे बोथट होत नाही, हे गांधीनी आपल्या सहकाऱ्यांना पटवून दिले होते. आत्मक्लेश हे सत्याग्रहीचे मुख्य अस्त्र असेल तर त्यासाठी सत्याग्रहींना तयार करणे आवश्यक होते. लढाऊ सैन्याला जितके युध्दकौशल्यात तयार करणे आवश्यक असते, तितकेच गांधींना काही वर्षापुर्वी फिनीक्स आश्रमाची स्थापना केली ती जॉन रस्कीन यांच्या तत्वज्ञानानुसार. परंतु हळूहळू लिओ टॉलस्टॉय यांची विचारधारा आणि हेन्री डेव्हिड थोरो यांनी स्वतः आचरलेली तत्वे यांचाही स्विकार करण्यात आला. टॉलस्टॉय फार्मची स्थापना झाली ती सत्याग्रहीच्या कुटुंबीयांना आसरा मिळावा आणि त्याचवेळी त्यांची पुढील लढयासाठी तयारी करावी, यासाठीच. तुरुंगात काफिर कैद्यांना जो मानहानीकारक युनिफॉर्म देत असत, तसेच कपडे वापरण्याची सवय देखील या आश्रमवासीयांना लावली होती. सत्याग्रहाचे एक महत्वाचे तत्व असे होते की, या तत्वांची न्याय्यता लक्षात आणून देवूनच प्रतिस्पर्ध्याला गाठणे हे गांधीना मान्य नव्हते. त्यांनी सत्याग्रह पुढे ढकलला. गांधींचे सहकारी या विचारसरणीत एवढे मुरलेले होते की, तेही या गोष्टीला तयार नव्हते. १९१३ मध्ये लॉंगमार्च वेळी गांधी आणि त्यांचे मुख्य सहकारी कॅलन बॅक आणि पोक्राक यांना एकापाठोपाठ अटक झाली. तरीही सत्याग्रही शिस्तीने शांततामय राहिले. मोर्चेकऱ्यांनी जरासे हिंसक वळण घेतले असते तरी त्यांचा नायनाट करणे स्मट्सच्या माणसांना सोपे गेले असते. अखेरीस दक्षिण आफ्रिकेतील अत्याचार सहन न होवून हिंदुस्थानातील व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांनी आपला आवाज उठवला. जनरल स्मट्स यांनी सॉलोमन कमिशन नेमले. गांधीनी सत्याग्रह मागे घेवून या कमिशनशी सहकार्य करावे, असे गोपाळकृष्ण गोखले यांचे मत होते. परंतु जोवर आपल्या मूळ अटी मान्य होत नाहीत तोवर गुरुची आज्ञादेखील मानणार नाही, अशी भूमिका घेवून गांधीनी सत्याग्रह चालूच ठेवला. स्मट्स या चळवळीला कंटाळले होते. त्यांना युनियन ऑफ साऊथ आफ्रिका या नवीन देशाच्या प्रगतीत हा अडथळा नको होता. त्यांनी कमिशनकडून आपल्याला तात्पुरते हवे ते वदवून घेतले आणि १९१४ मध्ये इंडियन रिलीफ ॲक्ट संमत झाला. सत्याग्रहीच्या सर्व मागण्या मान्य झाल्या.

आयतीच संधी आली आहे तर आणखीही काही मागण्या मान्य करुन घ्याव्यात, अशी काही सहकाऱ्यांची सूचना होती. गांधीनी त्या सूचनेला स्पष्ट विरोध केला.

महात्मा गांधींचं व्यक्तीमत्व हे मूलतः आत्मशक्ती साधकाचं होत. साधक शब्दप्रयोग केला की, आपल्याला केवळ जंगल व पद्मासन आठवते, किंवा धर्माचा आधार असलेली इतर कोणती तरी बाब आपल्या ध्यानात येईल. हा आपल्या पूर्वग्रहांचा परिणाम आहे. ही साधना सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करत, समाजसमर्पित जीवन जगत करता येते व ती त्यांनी केली. आजही कोणतीही भौतिक सुखसाधने न गमावता छोटया समूहातील असे जीवन अनेकांना आवडेल. गांधींचा मात्र या आधुनिक जीवनशैलीतील सुख-सोईंनाच विरोध होता.साऱ्या समाजाने वरील श्रेयस स्विकारलं तर कदाचित त्यालाही ते पटेल. पण आज वस्तुस्थिती काय आहे ? आज समाजाचा हा भौतिक सुखाचा प्रवास दुसऱ्या टोकाला गेला आहे व अत्यंत वेगाने त्या दिशेला जातच आहे. सुमारे शंभर वर्षापुर्वी गांधींनी जी पश्चिमी संस्कृती, जीवनशैली ठामपणे नाकारली ती संस्कृती त्याच दिशेने तेव्हापासून अनंत योजने पुढेगेलेली असूनही जागतिकीकरणाच्या मागे अधीरपणे ऊर फुटेपर्यंत धावत आहे असं चित्र दिसत आहे. तक्रार असेलच तर जागतिकीकरणाचे फायदे मिळत नाहीत वा नोकरीधंद्यावर परिणाम होवून जगण्याची समस्या निर्माण झाली आहे, अशा स्वरु पाचीआहे. नव्या चकचकीत जीवनशैलीविषयी नाहीय, एका बाजूला बाजारातील असंख्य चकचकीत वस्तूनी जीवन अव्याहतपणे भरीत राहणं, हीच जीवनाची इतिकर्तव्यता बनू पाहात आहे. तर दुसरीकडे मानसिक तणाव हा सर्वात मोठा सामाजिक किलर बनला आहे. जीवनाच भौतिक अत्यंत महत्वाचं बनले आहे. त्याशिवाय धर्म, आध्यात्म, आत्मशक्ती या गप्पाच, यात शंकाच नाही. पण तो प्रश्न सुटला तरी मानवी दु:खाची व्याप्ती किती प्रचंड आहे हे दाखवणारा हा किलर. अशा सर्व परिस्थितीत हा महाकालौघ उलटया दिशेला राजकीय-आर्थिक विचार देण व गांधीच्या श्रेयसानुकुल असा राजकीय-आर्थिक व्यवहार्य ढांचा उभारण्याविषयी समाजाला प्रेरित करणे हे गांधी विचार समाजपरिवर्तनासाठी उपयोगात आणणाऱ्यांच्या राजकीय प्रतिभेला मोठे आव्हान आहे. वंचित आता जागृत, संघटित होत आहे, त्याची ही गती आधुनिक व्यवस्थेत थांबणार नाही हे स्वाभाविक आहे. पण दारिद्र्य व विषमतेचं वेगानं निर्मूलन करुन वैश्विक पातळीवर साऱ्या मानवाला योग्य अशा चांगल्या भौतिक स्तराचे जीवन हे आजची जीवनशैली नाकारीत व नव्या जीवनशैंलीसह व तेही नजीकच्या भविष्यात देईल असा राजकीय विचार,कार्यक्रम आज तरी दृष्टिपथात दिसत नाही. असा कार्यक्रमकेवळ आदर्शवादाची मांडणी असून चालणार नाही, तर तो व्यवहार्य देखील असला पाहिजे. त्याच्या व्यवहार्यतेचा उत्तम पुरावा म्हणजे त्यात पश्चिमी जीवनशैली नाकारुन नवी जीवनशैली स्विकारण्यास मानवाला प्रेरित केले पाहिजे.ज्या नवमानव, नवसमाजासाठी अनेक देशात साम्यवादी क्रांती व वर्गसंघर्ष झाले त्याचा लाभकरी वर्गच आज जगभर जागतिकीकरणाच्या अंतहीन चंगळवादी म्हटल्या जाणाऱ्या संस्कृतीचा कणा आहे. मानवी इतिहासातील क्रांतीकारी परिवर्तनाचा पहिला १५० वर्षांचा (कम्युनिस्ट मॅन्युफॅस्टो-१८४८) प्रयत्न बदलू न शकलेल्या मानवाच्या नेचरच्या तर

खडकावर फुटला नाही ना ? गांधींच्या 'एक पाऊल पुरे' या विचाराचे व 'मीन्स'च्या आग्रहाचे महत्व इथं लक्षात येते.[११] गांधींच्या बाबतीतही असं म्हणावे लागेल, की स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात राष्ट्राने अहिंसा स्विकारली ती निष्ठा म्हणून नव्हे, तर स्वातंत्र्य लढयाचा व स्वातंत्र्यप्राप्तीचा व्यवहार्य रस्ता म्हणूनच. त्याचा प्रत्यय रक्तलांच्छित फाळणीनं लवकरच आणून दिला, हे लक्षात घ्यायला हवं. तसेच राष्ट्राने चरखा, खादी प्रतिके स्विकारली ती साम्राज्यवादाच्या विरोधातील म्हणूनच. अ-पश्चिमी साधेपणाची जीवनशैली यांचा अंतःकरणपूर्वक केलेला स्विकार म्हणून नव्हे, हे ही आज स्पष्ट दिसतच आहे. या साऱ्यांचा अर्थ काय ?

**निष्कर्ष :**शंभर वर्षानंतरच्या काळात ज्यावेळी सहजी सुटणार नाहीत असे प्रश्न उभे राहतात तेव्हा गांधीची नीती हेच कदाचीत यावर उत्तर असू शकेल याची जाणीव होते. मग तो काश्मीरचा प्रश्न असो, मध्यपुर्वेतील गोंधळ असो, पूर्व युरोपमधील गुंता असो की श्रीलंकेतील वांशिक वाद असो. प्रेमाच्या आधारे प्रतिस्पर्ध्यांबरोबर न्याय्य निर्णयाकडे पोचणे हा एकच गांधीवादी मार्ग त्यावर दिसतो. परंतु सत्याग्रह या सर्वात ताकदवान अस्त्राचा उपयोग करण्यापुर्वी त्याची तात्विक बैठक आणि तंत्र समजावून घेतले पाहिजे. अन्यथा आधुनिक काळातील सिंथेटीक सत्याग्रही अशीच त्यांची प्रतिमा निर्माण होईल.'बुध्दाचा करु णामय, येशूचा क्षमाशील, पैगंबराचा परोपकारी व श्रीकृष्णाचा निष्काम कर्मयोगी' समाज हजारो वर्ष झाली तरी अजून पुर्णपणे अस्तित्वात आलेला नाहीतो त्यांनी समाजाच्या विशीष्ट बाह्यरचनाचा आग्रह धरला नाही वा त्या उभारल्या नाहीत म्हणून, की त्याला अनुकूल मानवी मन बनलं नाही म्हणून ? पण तरीही ते महात्मे मानवाला मार्गदर्शक, प्रेरणादायी, दीपस्तंभच आहेत, भोगग्रस्त नसलेला, सर्वार्थाने निर्मळ, साधं, सुंदर जीवन जगणारा असा आदर्श मानवी समाज कधीकाळी अस्तित्वात येणार आहे की नाही, व येणार असेल तर तो कोणत्या मार्गाने, सृष्टिचक्र ाचा भाग म्हणून, विचारपूर्वक की आधुनिक भोगातिरेकाला विटून, की कोणा परमेश्वराच्या इच्छेनं की जडवाद्यांच्या विशीष्ट अणुसंयोगाच्या अपघातानं, हे कुणास ठाऊक. आणि तसा समाजही पुन्हा भोगग्रस्ततेच्या मार्गाकडे जाणारच नाही, ही हमी कुणी द्यावी ? पुर्णतः प्रिमिटिव्ह कम्युनिझम मध्ये शेकडो वर्ष नर्चर झालेल्या मानवी मनात संधी निर्माण होताच 'सरप्लस' मूल्यांचा पहिला वाटा उचलण्याच्या स्वार्थी विषम प्रवृतीचा उगम कसा झाला याचं उतर जडवाद देतो का ?एकीकडे भोगमय जीवनच सृष्टीचक्र ाच व स्वतःच्या आतील वास्तव न रडता स्विकारु न जगत असताना संयमाचा विचार, व्यवहार वाढवण्यासाठी धडपड करीत राहणं, एवढाच मार्ग आपल्याकडे उरतो. या मार्गावर महात्मा गांधीचा विचार आपल्याला जगण्याचे साधन म्हणून उपयोगी पडेल.

संदर्भ सूची :-

१) मानवी हक्क आणि महात्मा गांधी, लिआ लेव्हिन, नॅ. बु. ट्र. दिल्ली, १९६७

२) हिंद स्वराज्य, महात्मा गांधी, नवजीवन प्रकाशन अहमदाबाद, १९७८

३) सत्याचे प्रयोग, महात्मा गांधी, नवजीवन प्रकाशन अहमदाबाद, १९७९

४) गांधी जीवन रहस्य, आचार्य जावडेकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९५